**नि.दिवाणी दावा क्रं.९७/२०१६**

**नि. क्रं.५७**

**:: प्रतिवादीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एस.बी. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरू. ::**

०६. माझे शिक्षण इयत्ता ९ वी पर्यंत झाले. माझ्याकडे दवणहिप्परगा येथे वडिलोपार्जित ७ एकर जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.१२/१२/१९८८ मध्ये वादीकडून सर्वे क्र.१३६ मधील १ हे. २१ आर जमीन रु.३०००/– मध्ये विकत घेतली होती. सदर खरेदीखताचा क्रमांक ३७५७/१९८८ आहे हे मला माहीत नाही. माझ्या भावाने माझ्या नावे जमीन घेतली असेल हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावे सर्वे क्र.१३६ मध्ये १ हे. २१ आर जमीन आहे. वादीचा मुलगा परमेश्वर याने सदर खरेदीखताच्या अनुषंगाने माझ्याविरुध्द दिवाणी दावा क्र.४१४/२००० दाखल केला होता हे मला माहीत नाही. सदर दाव्यामध्ये माझे वकील माधवराव पाटील रा. उदगीर हे होते याबाबत मला माहीत नाही.

०७. वादीची सर्वे क्र.१३७ मध्ये किती जमीन होती हे मला माहीत नाही. मला वर्ष आठवत नाही. वर्ष १९७८ मध्ये वादीने मधुकर चिद्रे यांचे पैसे देण्यासाठी शिवराज माधवराव बिरादार यांच्याकडून पैसे घेतले होते. माझ्या आणि उमेश अमृत बिरादार यांच्यासमक्ष वादी आणि प्रतिवादी क्र.२ यांच्यामध्ये काय झाले हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला पैशाची गरज असल्याने वादीने प्रतिवादी क्र.३ ला वाद जमिनीचे खरेदीखत ₹.१०,०००/– च्या मोबदल्यात दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी कथित गहाणच्या व्यवहाराला हजर नव्हतो. बाबुराव पाटील यांनी मला सांगितले होते की, वादीने शेत गहाण ठेवून पैसे काढले आहेत. बाबुराव पाटील जिवंत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीने खरेदीखताने प्रतिवादी क्र.३ ला ७ एकर जमिनीचा ताबा दिला होता. वादीने प्रशांत कल्याणराव वलांडे यांना ३ एकर जमीन विकली, प्रदीप

कल्याणकर दवाणहिप्परगे यांना ४ एकर जमीन विकली आणि बाबुराव दिगंबर सगर यांना ३ एकर जमीन विकली हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीदारांच्या ताब्यामध्ये सदर जमिनी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी विकत घेतलेली जमीन माझ्या ताब्यात आहेत.

प्रश्न – तुम्ही वादीकडून विकत घेतलेली जमीन कोणाच्या नावे केली ?

उत्तर – मी वादीकडून जमीन विकत घेतलेलीच नाही.

०८. प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.१ ला दि.०६/०५/१९९४ रोजी ₹५३,०००/– च्या मोबदल्यात वाद जमीन नोंदणीकृत खरेदीखताने विकली हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद जमीन प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे व त्याच्या नावे फेरफार झाला. हे म्हणणे खरे नाही की, वादीला पैशाची गरज असताना प्रतिवादी क्र.३ कडून ₹१०,०००/– हातउसणे घेतल्याचे आणि त्याच्या परतफेडीच्या हमीकरिता वाद जमिनीचे गहाणखत लिहून दिल्याचे आणि त्या संबंधाने अटी ठरल्याचे खोटे सांगितले. माझ्या शपथपत्रातील सिक्युरिटी आणि नॉमिनल या शब्दांचा अर्थ मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा ताबा असल्याचे मी खोटे सांगितले.

०९. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ च्या नावे नॉमिनल खरेदीखत व गहाणखत असल्याचे खोटे सांगितले. किती दिवस गहाणखत ठेवायचे किंवा काय करायचे हे माझ्यासमक्ष ठरलेले नव्हते. प्रतिवादी क्र.३ ने वादीला केव्हा पैसे परत मागितले हे मला माहीत नाही. मधुकर चिद्रे यांनी पैसे मागितल्याने वादीने शिवराज बिरादार यांच्याकडून पैसे घेऊन दिले होते. वादीने ₹३३,०००/– दवणहिप्परगा येथे मधुकर चिद्रे यांना दिले. मी सांगितल्याप्रमाणे माझ्या शपथपत्रातील मजकूर लिहिलेला आहे.

१०. मला प्रतिवादी क्र.१ विरुध्द सरतपासातील मजकुराबाबत माहिती नाही. प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.१ ला केव्हा खरेदीखत दिले हे मला माहीत नाही. कोणत्या वर्षापासून कोणत्या वर्षापर्यंत ₹५,०००/– व्याज दिले हे मला माहीत नाही. मला वादीने सदर व्याजाच्या स्थितीबाबत सांगितले होते. प्रतिवादी क्र.२ म्हणजेच शिवराज बिरादार आहेत. त्यांनी माझ्यासमक्ष वादीला पैसे दिले. परंतु त्याची पावती घेतली नव्हती व त्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासाच्या परिच्छेद क्र.३ मध्ये खोटा मजकूर लिहिला. मी नागेशला ओळखत नाही. तो कोठे राहतो हे मला माहीत नाही. माझ्या शपथपत्रामधील प्रतिवादी क्र.१ हा शब्द बाबुराव पाटील यांच्या सांगण्यावरून लिहिलेला आहे.

११. सरतपासाच्या परिच्छेद क्र.४ मधील मजकुराच्या अनुषंगाने शिवराजने वादीला ₹३३,०००/– दिले आणि वादीने सदर रक्कम रतिकांत यांना दिले. बाबुराव पाटील आणि वैजनाथ चिद्रे हे पंच होते. वादीने मुद्दल रक्कम केंव्हा दिली हे मला माहीत नाही.

प्रश्न – प्रतिवादी क्र.१ ने खरेदीखत परत करण्यास टाळाटाळ केली हे तुम्ही खोटे सांगितले ?

उत्तर – मी प्रतिवादी क्र.१ किंवा नागेश यांना ओळखत नाही.

१२. दि.१५/१२/२०१५ रोजी वादीने प्रतिवादी क्र.२ ला ₹३३,०००/– दिल्याचे मला माहीत नाही. मी ते सरतपासामध्ये लिहिण्याचे सांगितले नव्हते. ते कोणी लिहिले हे मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.१ व त्याचा चुलता रामराव बिरादार यांच्या कोर्टात वाद चालू आहेत व वादीने त्यांचा समीट केलातर जमीन परत करून देतो याबाबत मला कोणीही सांगितले नाही, मला

त्याबाबत माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ ने दि.१०/०८/२०१६ रोजी खरेदीखत परत करण्यास नकार दिला याबाबत मला कोणीही सांगितले नाही किंवा मला त्याबाबत प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीने सांगितल्याप्रमाणे खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि.०६/०४/२०२६.